नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/03/2024 (शुक्रवार) सकाळ

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## वाहनासह एकुण ५७,७७,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
## नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई

दिनांक ०७/०३/२०२४ राजी मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे भिवापूर हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, भिवापुर कडुन नागपुर कडे अवैध रित्या विनापरवाना रेती (वाळू) टिप्परमध्ये लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून थुटानबोरी फाट्याजवळ नाकाबंदी करीत असताना एक पिवळया रंगाची अशोक लेलॅड कंपनीचे १० चक्का टिप्पर वाहन क्र. एम.एच—४०/बि.जी— ६९६४ व टिप्पर वाहन क्र. एम.एच—४०/सि.एम— ५८३४ एकामागे एक आढळुन आल्या. स्टाफने वाहनांना थांबवून पाहणी केली असता दोन्ही वाहनामध्ये अंदाजे १२ ब्रास रेती ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपींच्या ताब्यातून १० चक्का टिप्पर वाहन क्र. एम.एच—४०/बि.जी— ६९६४ किंमती २२,००,०००/—रू. मध्ये ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/—रू. २) टिप्पर वाहन क्र. एम.एच—४०/सि.एम— ५८३४ किंमती ३५,००,०००/—रू. मध्ये ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/—रू. ०२ मोबाईल किंमती १७,०००/—रू. असा एकुण ५७,७७,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करून **आरोपी नामे— १) अंकुर राजेंद्र रडके, वय २२ वर्ष, रा. भिवापूर (उटी), तह. उमरेड** (१० चक्का टिप्पर वाहन क्र. एम.एच—४०/बि.जी— ६९६४ चा चालक) **२) मयुर मनोज मेश्राम, वय २२ वर्ष, रा. नवेगाव (देशमुख) तह. भिवापूर** (१० चक्का टिप्पर वाहन क्र. एम.एच—४०/बि.जी— ६९६४ चा कंडक्टर) यांनी वाहन मालक नामे— ३) **जितु वैद्य वय ३५ वर्ष, रा. पाचगाव ता. उमरेड** आणि वाहन चालक **४) अजय बंडु राउत, वय २८ वर्ष, रा. वार्ड क्र. २, चांपा ता. उमरेड** (टिप्पर वाहन क्र. एम.एच—४०/सि.एम— ५८३४ चा चालक) **५) अविनाश रेवनाथ नानवटकर, वय २७ वर्ष, रा. राणी लक्ष्मीबाई वार्ड क्र. १० ता. जि. भंडारा** यांनी मालक नामे— **६) पवन जुनघरे, वय ३० वर्ष, रा. खापरी नागपूर** यांचे सांगणे प्रमाणे विनापरवाना रेती चोरी करून वाहतूक करताना मिळून आले. असे एकुण ०६ आरोपी यांचेविरुद्ध पोस्टे भिवापूर येथे अप क्र. ९८/२०२४ कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. अमित पांडे, पोलीस हवालदार ललीत उईके, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, शुभम मोरोकार विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर